# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र. २२१/२०१२**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० (१) मधील तरतूदीनुसार माहिती अधिकाऱ्यांवर बजावलेली शास्ती ताबडतोब वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या मा. अपर मुख्य सचिव (र. व का.), महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक - संकीर्ण २०१२/८०५/प्र.क्र.३८१/६, दिनांक ०४/०९/२०१२ अन्वये करण्यात आलेल्या सूचना अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख/ विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्याबाबत मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून पत्र क्रमांक - माअअ२०१२/प्र.क्र.६९-२०१२/आस्था-२, दिनांक १५/०९/२०१२ रोजीच्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. सदरहू पत्रं व सूचना यासोबत जोडण्यात आलेल्या आहेत. सदर सूचना विचारात घेऊन सदरबाबत आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. (~~कॅप्टन~~) सी. एम. चितळे)
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. - मा.अ./१९१०
दिनांक - २८ /१० /२०१२

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
२) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
३) सर्व प्राचार्य/संचालक, पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

Received from The Registrar office on 11/10/2012 at 11.55 am

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : माअअ २०१२/प्र.क्र.६९-२०१२/आस्था-२

उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५.९.२०१२

माहिती अधिकारी कार्यालय
आवक क्रमांक - मा. अ./9638
दिनांक - 11/10/2012

प्रति,

**सर्व सहसचिव / उपसचिव,**
**आयुक्त** (व्यवसायप्रशिक्षण), **संचालक** (उच्चशिक्षण /तंत्रशिक्षण /व्यवसायशिक्षण /कला /ग्रंथालय),
**कुलसचिव** (सर्व अकृषीक विद्यापीठे),
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन.

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 2341
दिनांक - 05/10/12
धारक दिनांक- 10/10/12
विभाग - PIO

UNIVERSITY OF PUNE (General Section)
1 OCT 2012
Inward No. 871

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियमंच्या कलम २०(१) अन्वये
**शास्ती संदर्भात** कार्यवाही करण्याबाबत...

%

सोबत, उपरोक्त विषयाबाबतचे अपर मुख्य सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०१२/८०५/ प्र.क्र.३८१/६, दिनांक ४.९.२०१२ (सहपत्रासह) जोडले आहे.

सदरचे पत्र स्वयंस्पष्ट असून, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २०(१) मधील तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यांवर बजावलेली शास्ती ताबडतोब वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सर्व सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख / विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

(बा. म. राऊत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

जनमाहिती अधिकारी

मा. अ.

10/10

Please note.
12/10.

४३१ (विस्तार), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ (०२२) २२७९ ३०९८

**महाराष्ट्र शासन**

<u>तातडीचे</u>

क्रमांक - संकीर्ण २०१२/८०५/प्रक्र ३८१ /६
सामान्य प्रशासन विभाग,
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२०४९५४३
दिनांक:- ४ सप्टेंबर, २०१२.

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय - माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही करण्याबाबत

संदर्भ - राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे क्र.मुमाआ /अपील /शास्ती / २०१२,दि.१७/८/२०१२ चे अ.शा.पत्र.

महोदय,

मा.मुख्य माहिती आयुक्तांच्या संदर्भाधीन पत्राची प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

सदर पत्रान्वये मा. माहिती आयुक्तांनी असे कळविले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अंतर्गत राज्य माहिती आयोगाने कोणत्याही तक्रारीवर किंवा अपिलावर निर्णय देतेवेळी जन माहिती अधिका-याने कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्विकारण्यास नकार दिला आहे किंवा चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे असे आयोगाचे मत झाले असेल अशा प्रकरणात शास्ती लावण्याची तरतूद आहे. आयोगाने आतापर्यंत अशा अनेक प्रकरणात शास्ती लावली असली तरी याबाबतची प्रत्यक्ष वसूली मात्र नीटपणे होत नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असल्याने आयोगाने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, मा.माहिती आयुक्तांच्या वरील पत्रात उल्लेख केलेल्या सूचनेचे आपल्या विभागाच्या स्तरावरुन तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख व सर्व सार्वजनिक प्राधिकरणांकडून काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी तसेच याबाबत

आपण आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यां सूचना द्याव्यात ही विनंती.

आपणास असेही कळविण्यात येते की, ज्या ज्या वेळी आपणास वरीलप्रमाणे शास्ती लावण्याचे / वसूलीचे आदेश माहिती आयोगाकडून प्राप्त होतील त्यावेळी लगेच असे आदेश संबंधितांना पाठवून वसूली संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना द्याव्यात अशी ही विनंती.

सोबत-वरीलप्रमाणे

आपला, विश्वासु
पीएस मीना

**( डॉ.पी.एस.मीना )**
**अपर मुख्य सचिव (र. व का.)**

प्रत-

प्रभारी सचिव, राज्य माहिती आयोग यांना अ.शा.प.क्र.मुमाआ/अपिल/शास्ती २०१२, दि.१७/८/२०१२ च्या संदर्भात माहितीसाठी अग्रेषित

S.O. - Letter.lwn228D:\sushama

रत्नाकर गायकवाड
मुख्य माहिती आयुक्त

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८५ ६० ७८
फॅक्स क्रमांक : ०२२-२२०४ ९३ ९०
E-mail : ratnakargaikwad@hotmail.com

१३ वा मजला
नवीन प्रशासकीय इमारत
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड
मुंबई ४०० ०३२

दिनांक :

अ.शा प क्र.मुमाआ/अपील/शास्ती/२०१२

दिनांक १७ ऑगस्ट २०१२

प्रिय श्री. मीना

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये ज्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे आपले कर्तव्य नीट बजावित नाहीत व माहिती देण्यास टाळाटाळ करतात तसेच चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देतात, त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमात आहे. आयोगाने आतापर्यत सुमारे १७४९ प्रकरणामध्ये शास्ती लावली असून, याबाबतची प्रत्यक्ष वसूली मात्र योग्य रितीने होत नसल्याचे दिसून आले आहे.

यासाठी आयोगाच्या निर्णयानुसार आता, प्रत्येक शास्तीच्या आदेशाची प्रत संबंधित विभाग प्रमुखांना दिली जाते कारण संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून शास्तीच्या रक्कमेची वसूली करणे ही सर्वस्वी जबाबदारी त्या त्या विभाग प्रमुख यांची राहील.

आपणांस विनंती करण्यांत येते की,याबाबतच्या स्वयंस्पष्ट सूचना राज्यातील सर्व विभाग प्रमुखांना देण्यांत याव्यात.

आपला

(रत्नाकर गायकवाड)

श्री.पी.एस.मीना
प्रधान सचिव
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई